

# हॅलो प्रभात

नवे विचार...नवी सुरुवात

RNI NO. MAHMAR/2020/79996

■ संपादक : संजीव शाळगावकर

■ मुंबई ■ पुणे ■ अहिल्यानगर ■ कोल्हापूर ■ सातारा ■ सांगली

पुणे ● वर्ष : ०६ ● अंक : २८२ ● गुरुवार, दि. १५ जानेवारी २०२६ ● किंमत : ३ रूपये ● पाने : ४


## निवडणूक आयोगाच्या भरारी पथकाची धाड

**पुणे : हॅलो प्रभात**

महाराष्ट्रात महानगरपालिका निवडणुकीच्या पूर्वसंध्येला ठिकठिकाणी अनेक धक्कादायक घटना घडल्या आहे. मतदारांना फितवून काही ठिकाणी पैसे वाटप करण्याचं काम सुरु आहे तर, काही ठिकाणी महागड्या वस्तूंचं वाटप करण्यात येत आहे. प्रचाराच्या तोफा थंडावल्यानंतर आता छुप्या पद्धतीने राजकीय पक्ष मतदारांना आपल्या पक्षाच्या बाजून वळवण्याचा प्रयत्न करत आहे. पिंपरी-चिंचवडमधून असं एक प्रकरण समोर आलं आहे. अंधार कांड सुरु असल्याचं कळताच भरारी पथकाची धाड पडली. पिंपरी चिंचवड महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ड क्षेत्रात चक्क वॉशिंग मशीनचं वाटप सुरु होतं. निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या नियंत्रणाखाली नियुक्त करण्यात आलेल्या भरारी पथकाने रहाटणी येथील गणराज कॉलनी येथे 19 वॉशिंग मशीन जप्त केल्या आहेत. 12 जानेवारी 2026 रोजी रात्री साडे दहाच्या सुमारास ही कारवाई करण्यात आली आहे.

## संक्षिप्त...

### शिवसेनेच्या उमेदवारांना धमक्या

**पुणे : हॅलो प्रभात**

महापालिका निवडणुकीत आम्ही आरोप- प्रत्यारोपांऐवजी सकारात्मक प्रचारावर भर दिला. मात्र, काही पक्षांतील उमेदवार मतदारांना पैशांचे आमिष दाखवत आहेत. याशिवाय शिवसेनेच्या उमेदवारांना धमक्या देत दबावाचे राजकारण करत असल्याचा आरोप शिवसेनेच्या नेत्या व विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी पत्रकार परिषदेत केला. त्याबाबत दोन ठिकाणी तक्रारही दिल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पुणे महापालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत शिवसेनेचे ११९ उमेदवार स्वबळावर नशीब आजमावत आहेत. शिवसेनेचे प्रमुख नेते एकनाथ शिंदे यांनी पुण्याचे पुणेरीपण जपत अंमली पदार्थांची तस्करी, कोयता गँगचा त्रास आणि वाढती गुन्हेगारी नष्ट करून वाहतूक कोंडीमुक्त शहर घडविण्याचा निर्धार व्यक्त केल्याचे गोऱ्हे यांनी सांगितले.

### गट, गणांसाठी अर्ज केवळ ऑफलाइनच

**पुणे : हॅलो प्रभात**

जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज केवळ पारंपरिक पद्धतीने अर्थात ऑफलाइन म्हणजेच समक्ष भरले जाणार आहेत. अर्ज भरण्याची प्रक्रिया शुक्रवारपासून (दि.१६) सुरू होत आहे. जिल्ह्यातील १३ तालुक्यांच्या ठिकाणी नामनिर्देशन अर्ज दाखल करण्याची व्यवस्था प्रशासनाच्या वतीने करण्यात आली आहे. नगर परिषद निवडणुकीत दोन्ही पद्धतीने अर्ज स्वीकारण्यात येत होते. मात्र, त्यात तांत्रिक अडचण आल्यानंतर राज्य निवडणूक आयोगाने ही सुधारणा केली आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुकीसाठी आचारसंहिता लागू करण्यात आली असून, अर्ज भरण्यासाठी प्रक्रिया शुक्रवारपासून (दि. १६) सुरू होईल. अर्ज भरण्याची अंतिम मुदत २१ जानेवारी असून, दुपारी ३:०० वाजेपर्यंत अर्ज स्वीकारले जातील.

# अजितदादांचे आरोप, भाजपा बॅकफूटवर?

## अजितदादांनीच काढला भाजपाचा सिंचन घोटाळा : २५ वर्षांपूर्वीचा दाखला, भाजपा फंडासाठी १०० कोटी

**पुणे : हॅलो प्रभात**



महाराष्ट्रातील महानगरपालिका निवडणुकांच्या अनुषंगाने 'महायुती' मधील सत्ताधारी पक्ष असलेले भाजपा आणि राष्ट्रवादी काँग्रेस आमने-सामने आले आहेत. सिंचन घोटाळ्याचे आरोप असलेल्या उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनीच आता थेट भाजपावर 'सिंचन घोटाळ्याचे गंभीर आरोप करून खळबळ उडवून दिली आहे. अजितदादांच्या आक्रमक बाऊन्सर्सपुढे भाजपाची भंबेरी उडाली असून ते बॅकफूटवर गेले आहेत.

पुणे आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर अजित पवार आणि भाजपा नेत्यांमध्ये चांगलीच खडाजंगी पाहायला मिळाली आहे. विशेष म्हणजे अजित पवारांनी भाजपावर थेट टीका केल्याने भाजपाच्या मंत्र्यांनीही अजित पवारांना लक्ष्य केलं. तर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही अजित पवारांना आधी टोला मारला, नंतर थेट टीका केली. त्यामध्ये, अजित पवारांवरील ७० हजार कोटींच्या सिंचन घोटाळ्याचा खटला अद्यापही कोर्टात सुरू आहे, असे म्हणत महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी एक प्रकारे इशाराच दिला होता.

आता, या सर्व पार्श्वभूमीवर अजित पवारांनी पुण्यातील पुरंदर उपसा सिंचनमधील घोटाळ्याची माहिती दिली. तसेच, मी जर ती फाईल काढली असती तर हाहा:कार माजला असता, असेही अजित पवारांनी म्हटले आहे.

महानगरपालिका निवडणुकांच्या अनुषंगाने अजित पवारांनी २५ वर्षांपूर्वीचा दाखल देत, भाजपावर सिंचन प्रकल्पातील भ्रष्टाचाराच्या मुद्यावरुन गंभीर आरोप केला आहे. ते म्हणाले, की सन १९९९ साली राज्यात जेव्हा कॉंग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे सरकार सत्तारुढ झाले, तेव्हा माझ्याकडे जलसंपदा खाते आले होते.

तेव्हा, पुणे जिल्ह्यातील पुरंदर उपसा सिंचन योजनेची फाईल माझ्याकडे आली. मी ती फाईल पाहिली असता, त्यामध्ये या योजनेची रक्कम ३१० कोटी रुपये असल्याचं आढळून आलं. मात्र, मी अधिकाऱ्यांना विचारलं असता त्यांनी या प्रकल्पाची किंमत आधीच्या सरकारने वाढवल्याचे सांगितले, अशी माहिती अजित पवारांनी दिली. आधीचे सरकार म्हणजे १९९५ ते ९९ राज्यात शिवसेना - भाजप युतीचे सरकार होते. या काळात स्व. मनोहर जोशी हे मुख्यमंत्री तर स्व. गोपीनाथ मुंडे हे उपमुख्यमंत्री होते. याप्रकरणी पुढे बोलताना अजित पवार म्हणाले, या प्रकल्पाची किंमत २०० कोटी रुपयेच असल्याचे त्या अधिकाऱ्याने माझ्यापुढे कबुल केले. तसेच, पुढे त्या अधिकाऱ्याने असेही सांगितले की, शंभर कोटी रुपये पार्टी फंडासाठी मागण्यात आले होते. मग, आम्ही अधिकाऱ्यांनी देखील त्यामध्ये आमचे १० कोटी वाढवले आणि प्रकल्पाची किंमत ३१० कोटी झाली.

### 'ती' फाईल अजूनही माझ्याकडे


**ती फाईल अजूनही माझ्याकडे आहे, जर ती फाईल काढली असती तर हाहा:कार माजला असता, असा भ्रष्टाचाराचा भन्नाट किस्साच अजित पवारांनी निवडणुकीच्या प्रचारादरम्यान आरोप - प्रत्यारोप करताना सांगितल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत.**

### पुढे काय होणार ?

**आत्ता भारतीय जनता पार्टी आणि अजितदादा यांच्यात काहीशी दरी निर्माण झाल्याचे चित्र असले, तरी १६ तारखेला मतमोजणीनंतर काय चित्र असणार आणि पुढे काय घडणार, याची मात्र उत्सुकता लागली आहे.**

## महायुती किंवा मविआला पाठिंबा नाही : मनोज जरांगे

**मुंबई : हॅलो प्रभात**



मुंबईसह राज्यातील २९ महापालिकांसाठी १५ जानेवारीला मतदान होतं आहे. निवडणुकीपूर्वी मराठा आरणक्षणाचे आंदोलक मनोज जरांगेंनी त्यांची भूमिका जाहीर केली आहे. महाविकास आघाडी किंवा महायुती कुणालाही पाठिंबा देणार नाही असं मनोज जरांगेंनी म्हटलं आहे. मनोज जरांगे म्हणाले, माझा मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्रात होत असलेल्या निवडणुकीत महायुती आणि महाविकास आघाडी असा कुणालाही पाठिंबा नाही. माझे जुने व्हिडिओ कोणी व्हायरल करत असतील तर ते योग्य नाही, माझ्या नावाने कुणी पत्रकं प्रसिद्ध करत असतील तर त्यावर कुणीही विश्वास ठेवू नये. जर कुणी स्थानिक पातळीवर पाठिंबा दिला असेल तर तो त्यांचा व्यक्तिगत विषय असेल त्याचा आमच्याशी कोणताही संबंध नाही, असं मनोज जरांगे पाटील म्हटलं आहे. आपण या निवडणुकीमध्ये मुंबईसह महाराष्ट्रमध्ये कोणालाही पाठिंबा दिलेला नाही. मी महाविकास आघाडी किंवा महायुतीला कसलाही पाठिंबा दिलेला नाही. पाठिंबा दिल्याचं काही पत्रक प्रसिद्ध झाले असेल किंवा मुंबईमध्ये असले काही प्रकार झाले असतील, परंतु माझा कुणालाही पाठिंबा नाही, असं मनोज जरांगे यांनी म्हटलं आहे. मराठा आरक्षणाला विरोध करणारे जर कोणी उभे असतील त्यांना मात्र मराठा समाजाने सहकार्य करू नये, असं मनोज जरांगे पाटील म्हणाले. ते लोक मराठा समाजाच्या लेकरांच्या मुळावर उठलेले आहेत, ते लक्षात घ्यावं. मुंबईसह, महाराष्ट्रात कोणाला पाठिंबा दिलेला नाही, हे लक्षात घ्यावं, असं मनोज जरांगे पाटील म्हणाले.

## नऊ वर्षांनंतर पुणे मनपात येणार नवे नगरसेवक

### आज मतदान प्रक्रिया ; प्रशासन सज्ज

**पुणे : हॅलो प्रभात**





पुणे महापालिका निवडणुकीसाठी आज मतदान, तर 16 तारखेला मतमोजणी होणार असून, तब्बल नऊ वर्षांनंतर महापालिकेच्या सभागृहात नवे नगरसेवक दाखल होणार आहेत. या पार्श्वभूमीवर एका बाजूला येणाऱ्या आर्थिक वर्षाच्या महापालिकेच्या अर्थसंकल्पाची तयारी अंतिम टप्प्यात पोहोचली असताना, दुसऱ्या बाजूला नव्या लोकप्रतिनिधींच्या स्वागतासाठी महापालिका प्रशासनाने सज्जता सुरू केली आहे. सभागृहातील रिकामी पक्ष कार्यालये, पक्षनेत्यांची कार्यालये तसेच महापालिका भवनातील अंतर्गत व्यवस्था, दुरुस्ती व रंगरंगोटीच्या कामांतून नव्याने सुसज्जता केली जात आहे. निवडणुकीनंतर तत्काळ कामकाजाला सुरुवात करता यावी आणि नव्या नगरसेवकांना आवश्यक सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी अनेक वर्षांपासून वापरात नसलेल्या पक्ष कार्यालयांची डागडुजी सुरू आहे. रंगकाम, विद्युत व्यवस्था दुरुस्ती, फर्निचरची देखभाल, पाणीपुरवठा व स्वच्छतेची कामे युद्धपातळीवर हाती घेण्यात आली आहेत. महापालिका सभागृह परिसरातही स्वच्छतेवर विशेष भर देण्यात येत आहे.दरम्यान, नव्या सभागृहाच्या कार्यकाळात विकासकामांना गती देता यावी, यासाठी येणाऱ्या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पाची तयारीही जोरात सुरू आहे. महापालिकेच्या सर्व विभागप्रमुखांना त्यांच्या विभागाशी संबंधित अद्ययावत माहिती, प्रलंबित प्रकल्प, प्रस्तावित विकासकामे तसेच आवश्यक निधीच्या मागण्या सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या माहितीच्या आधारे अर्थसंकल्पाचा प्राथमिक आराखडा तयार करण्यात येत असून, नव्या नगरसेवकांच्या अपेक्षांना अनुसरून विकासाभिमुख तरतुदी करण्यावर भर दिला जाणार आहे.

निवडणूक प्रक्रिया, अर्थसंकल्पीय नियोजन आणि प्रशासकीय तयारी या तिन्ही आघाड्यांवर एकाच वेळी सुरू असलेल्या हालचालींमुळे पुणे महापालिकेत पुन्हा एकदा लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीने प्रशासनिक यंत्रणा अधिक गतिमान होण्याची चिन्हे दिसत आहेत. नव्या सभागृहाच्या माध्यमातून शहराच्या विकासाला नवे बळ मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## भाजपा-शिवसेनेत रक्तरंजित राडा!

**डोंबिवली : हॅलो प्रभात**



डोंबिवली पूर्वेत प्रभाग क्रमांक २९ मध्ये तुकारामनगर, सुनीलनगर भागात शिवसेना (शिंदे) आणि भाजपाचे उमेदवार समोरासमोर उभे ठाकले आहेत. त्या ठिकाणी सत्ताधारी महायुतीचे घटक असणाऱ्या दोन पक्षांमध्ये रक्तरंजित राडा झाल्याने एकच खळबळ उडाली आहे.

या प्रभागात गेल्या काही दिवसांपासून तणावाचे वातावरण असून तीन दिवसांपूर्वी भाजपा उमेदवाराच्या प्रचारकांनी प्रभागात प्रचारपत्रकांसोबत पैसे वाटप केल्याचा आरोप या प्रभागातील शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार नितीन पाटील यांनी केला होता. ही घटना ताजी असतानाच पुन्हा याच वादातून सुनीलनगर भगतवाडी भागात शिवसेना (शिंदे) पक्षाचे उमेदवार नितीन मट्या पाटील, रवी मट्या पाटील आणि इतर आठ जणांनी भाजपा महिला उमेदवाराचे पती ओमनाथ नाटेकर (47) यांच्यावर जीवघेणा हल्ला केल्याने खळबळ उडाली होती. त्यातच रात्री उशिरा डोंबिवली पोलिसांनी शिवसेना उमेदवार नितीन पाटील आणि रवी पाटील यांना राड्याप्रकरणी पोलिसांनी मतदानाला काही तास शिल्लक असतानाच अटक केलीय. या घटनेमुळे शिवसेना शिंदे गटात एकच खळबळ उडालीय. विशेष म्हणजे त्यांच्या अटकेसाठी शिवसेनेच्या उमेदवारासह राड्यात सहभागी असलेल्या कार्यकर्त्यांनाही अटक करण्याच्या मागणीसाठी 13 जानेवारीला भाजपाच्या वतीने रामनगर पोलीस ठाण्यावर मूक मोर्चा काढण्यात आलाय. त्यानंतर पोलीस ॲक्शन मोडमध्ये येताच दोन्ही शिवसेना उमेदवारांना अटक केली. मात्र पोलिसांनी अटक करताच दोन्ही उमेदवारांची प्रकृती खालावली असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी ठाण्यातील एका रुग्णालयात हलविण्यात आले, अशी माहिती कल्याण ग्रामीणचे शिवसेनेचे आमदार राजेश मोरेंनी दिली असून, त्यांनी पोलिसांच्या कारवाईवर प्रश्न उपस्थित करत भाजपाच्या राजकीय दबावात काम करणाऱ्या पोलिसांचा निषेध केलाय.

ओमनाथ नाटेकर यांच्या पत्नी आर्या नाटेकर भाजपाच्या उमेदवार : डोंबिवली पूर्वेत प्रभाग क्रमांक 29 (ब) सुनीलनगरमध्ये भाजपाचे कार्यकर्ते ओमनाथ नाटेकर यांच्या पत्नी आर्या नाटेकर भाजपाच्या उमेदवार आहेत. हल्ल्यात जखमी झालेले ओमनाथ नाटेकर यांनी रामनगर पोलीस ठाण्यातील तक्रारीत म्हटले आहे की, मी ठेकेदार आहे. आयकॉनिक कन्स्ट्रक्शन नावाने माझा व्यवसाय आहे. माझी पत्नी आर्या ही भाजपाच्या उमेदवार म्हणून प्रभाग क्रमांक 29(ब) मधून निवडणूक लढवित आहे. पत्नीच्या प्रचारासाठी आम्ही कार्यकर्ते सुनीलनगर आणि इतर तीन प्रभागात फिरतोय.

सोमवारी रात्री पावणे दोन वाजण्याच्या दरम्यान मी, पत्नी आर्या, हेमंत म्हात्रे, चिन्मय वारंगे, प्रदीप सागवेकर, सचिन कोर्लेकर, अनुप शेलार आम्ही प्रचारासाठी सुनीलनगर भगतवाडी भागात फिरत होतो. प्रचार करून मी आणि माझे कार्यकर्ते घरी निघत होतो. त्यावेळी पावणे अकराच्या सुमारास शिवसेनेचे उमेदवार नितीन पाटील यांच्यासह अनंत ठाकूर, रवी पुनसकर, प्रसाद घाग आणि त्यांची दोन मुले आणि त्यांचे 50 ते 60 कार्यकर्ते आमच्या समोर आले. नितीन पाटील यांनी मला 'तुम्ही भाडोत्री येथे कशाला आलात. तुझी पत्नी कशी निवडून येते ते मी बघतोच. माझ्या प्रभागात प्रचाराला का येता? आज तुला कायमचा संपून टाकतो,' अशी भाषा केली. आपण येथे प्रचारासाठी आलोय, असे पाटील यांना मी सांगितले.

नितीन पाटील यांनी जवळील सदऱ्यातून धारदार हत्यार काढून शिवीगाळ करत आपल्या डोक्यात मारले. आपण गंभीर जखमी झालो. रवी पाटील यांनी आपल्यावर लोखंडी सळईने हल्ला केला. यावेळी नितीन पाटील आणि रवी पाटील यांची मुले आणि इतर कार्यकर्त्यांनी आम्हाला लाथाबुक्क्यांनी, बांबूच्या काठीने मारहाण केली. आपल्या बचावासाठी आलेल्या प्रदीप सागवेकर, अनुप शेलार यांनाही मारहाण करण्यात आली. आपली वैद्यकीय चाचणी करून आपणास एम्स रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले होते.

दडपशाहीतून सगळे प्रकार घडताहेत : सोमवारी रात्री भाजपाचे कार्यकर्ते ओमनाथ नाटेकर आणि त्यांचे समर्थक भगतवाडी भागात कोणतीही प्रचार सभा नसताना तेथे फिरून मतदारांना पैसे वाटप करीत होते. आपण पोलिसांना सतत याबाबत कळवत होतो. उशिराने पोलीस घटनास्थळी येताच भाजपाचे ओमनाथ नाटेकर आणि साथी पळून जाऊ लागले. आम्ही त्यांना पकडू लागलो. यावेळी ओमनाथ नाटेकर हे पडले आणि त्यांना काही लागले असावे. उलट त्यांनी आपल्या छातीवर मारेल. आपल्यासह कार्यकर्त्यांवर त्यांनी हल्ला केला, असे नितीन पाटील यांनी सांगितले. आपण हल्ला केला नाही. दडपशाहीतून हे सगळे प्रकार घडत आहेत, असे नितीन पाटील यांनी स्पष्ट केले होते.

### शिंदे यांच्या कार्यकर्त्यांवर गुन्हा दाखल

**या प्रकरणी रामनगर पोलीस ठाण्यात भाजपाच्या ओमनाथ नाटेकर यांच्या तक्रारीवरून शिंदे गटाच्या उमेदवारासह इतर कार्यकर्त्यांवर गुन्हा दाखल करत आतापर्यंत 6 शिंदेसेनेच्या कार्यकर्त्यांना अटक केल्याची माहिती एसीपी सुहास हेमाडे यांनी दिलीय. या राड्यात भाजपाचे 2 तर शिवसेनेचे 2 पदाधिकारी जखमी झालेत. दुसरीकडे शिंदेसेनेच्या उमेदवारासह राड्यात सहभागी असलेल्या कार्यकर्त्यांनाही अटक करण्याच्या मागणीसाठी भाजपाच्या वतीने रामनगर पोलीस ठाण्यावर मूक मोर्चा काढण्यात आला होता.**

## 'बहिणीं'च्या मतांवर पक्षांचा डोळा

### कुणाला होणार मत विभाजनाचा फायदा?



**मुंबई : हॅलो प्रभात**

'मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना' वर्ष २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत महायुतीसाठी तारणहार ठरली होती. 'लाडक्या बहिणीं'च्या एकगठ्ठा मतदानामुळे महायुतीचा विजय साकारला होता. मात्र, पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीत हीच योजना आता महायुतीसाठी ताकद ठरण्याऐवजी डोकेदुखी ठरण्याची चिन्हे दिसू लागली आहेत, यावेळी महायुतीतील घटक पक्ष एकमेकांसमोर उभे ठाकले आहेत. विधानसभेवेळी लाभार्थी लाडक्या बहिणींचा कौल एकगठ्ठा महायुतीच्या पारड्यात पडला आणि त्याचा थेट फायदा भाजप, शिंदेसेना आणि राष्ट्रवादी (अजित पवार) यांना झाला. पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीत महायुतीतील तिन्ही घटक पक्ष स्वतंत्रपणे रिंगणात उतरले आहेत.

शहरात लाडकी बहीण योजनेंतर्गत सुमारे ३ लाख ८९ हजार ९२० महिला लाभार्थी आहेत. त्यांचा कौल सर्वच ३२ प्रभागांमध्ये उलथापालथ करणारा आहे. त्यामुळे प्रचारात तिन्ही पक्षांचे नेते 'ही योजना आमचीच', 'महिलांसाठी आम्हीच लढलो' अशा श्रेयवादात अडकले आहेत.

लाडक्या बहिणींच्या मतांवर तिन्ही पक्षांचा डोळा असल्याचे स्पष्टपणे जाणवते. योजनेच्या श्रेयावर तिन्ही पक्षांचा दावा असला तरी लाडक्या बहिणींची मते विभागली जाण्याची शक्यता आहे.

भाजप, राष्ट्रवादी (अजित पवार) आणि शिंदेसेना यांच्यात ही मते फुटल्यास त्याचा नेमका फटका कोणाला बसणार, याबाबत जोरदार चर्चा सुरू आहे. लाडक्या बहिणींचा कौल भाजप, राष्ट्रवादी (अजित पवार) की शिंदेसेनेच्या पारड्यात पडतो, याकडे शहराचे लक्ष लागले आहे. या मतविभाजनाचा राजकीय अर्थ काय आणि त्याचा महायुतीतील अंतर्गत समीकरणांवर नेमका कसा परिणाम होतो, हे निकालानंतरच स्पष्ट होणार आहे.

## संपादकीय

# चला, आता फड जिल्हा परिषदांचा!

राज्यात झालेल्या २९ महानगरपालिकांच्या निकाल लागण्याच्या दिवसापासून जिल्हा परिषदेच्या आणि पंचायत समितीच्या निवडणुकांची रणधुमाळी सुरु होत आहे. किमान तीन, चार वर्षे तुंबलेल्या निवडणुका जाहीर झाल्याने जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या इच्छुकांना नक्कीच आनंद झाला असेल. मात्र, गेले सव्वा वर्ष महाराष्ट्र राज्य केवळ निवडणुकीच्याच वातावरणात अडकून पडले आहे, हे वास्तव आहे. राज्याची कामे होत आहेत, असे दिसत असले तरी ज्या ताकदीने ती कामे होणे अपेक्षित आहेत तशी होत नाहीत, हे मान्य करावेच लागेल ! एक तर निवडणुकीत सगळ्याच राजकीय पक्षांचा सहभाग, त्याचे नेते त्यात अडकले आहेत. दौरे, धावपळ, नंतर प्रचार सभापद यात्रा, अधून मधून अधिवेशनाचे तोंडी लावणे . त्यातून आचारसंहिता या सगळ्यातून सर्वसामान्यांचे प्रश्न समजावून घेणे आणि त्यावर मार्ग काढणे हे सहज सोपे, शक्य नाही, हे महत्त्वाचे!

विकासासाठी पोषक नाही : एक मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्री राज्याला असले तरी राज्याची लोकसंख्या सुमारे बारा कोटींवर आहे आणि या सगळ्यांसाठी या तिघांनी काय काय करावे, कसे आणि किती करावे? यावर खरे तर चर्चा होणे गरजेचे आहे. सलग सव्वा वर्ष केवळ निवडणुकीच्या वातावरणात शासन आणि प्रशासन गुंतून राहात असेल तर राज्याच्या विकासासाठी ते फारसे पोषक नाही. मात्र, निवडणूक होणे गरजेचे आहे, आवश्यक आहे. यावर 'एक देश एक निवडणूक' हा विषय पुन्हा एकदा लोकशाहीच्या मार्गाने सगळ्याच पक्षानी एकत्र येऊन आणि आपल्या अभिनिवेशाची जाणीव बाजूला ठेवून विचार, कृती केली पाहिजे. एकावेळी सगळ्या निवडणुका घेणेच या पुढे परवडणारे आहे, असे स्पष्ट दिसते. कारण पुढील निवडणूक याच प्रकारे, कालसुसंगत होणार आहेत. पाच वर्षातले दीड, दोन वर्ष निवडणुकीत जाणार असतील, तर ते परवडणारे नाही. सगळ्यांनीच याबाबत योग्य निर्णय घ्यायला पाहिजे.

सगळे उद्योग सत्ता मिळवण्यासाठी : आता निवडणुकांमध्ये मतदार आणि जनतेला काही मिळते का  हा प्रश्न सगळ्यात कळीचा आहे. जे काही सुरु आहे, ते केवळ सत्ता मिळवण्यासाठी पुढे जाऊन स्वार्थासाठी आणि पैसे मिळण्यासाठी हे आता जनतेला समजून चुकले आहे. मतदारही जेवढे काही मिळेल तेवढे घ्या, अशी मतदारांची मानसिकता आहे. मग ज्यांच्याकडे पैसे, सत्ता ते पुन्हा सत्तेकडे  जाणार हे नक्की आहे. अशा वेळी वेगवेगळे पक्ष, त्यांचे नेते जे काही आता वागत आहेत ते सर्वसामान्यांना न समजणारे आहे. सर्वसामान्यांना ज्या आवश्यक गरज आहात त्या  त्यांना मिळतील का? आज ठाकरे बंधू अदानी , मराठी या विषयावर अडून आहेत. भाजप हिंदू आणि मराठी या विषयावर भक्कम आहे. काँग्रेस एकीकरण आणि धर्मनिरपेक्षता याला धरून आहे. या सगळ्यात पाणी, रस्ते, आरोग्य ,शिक्षण कुठेच नाही. त्यातूनही हे जे काही सुरु आहेत, ते केवळ मुंबई पुरते. बाकी २८ महानगरपालिकांचे काय ?

मुंबईतला पैसा बोलतोय : राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि उपमुख्यमंत्री अजित पवार पुणे तर एकनाथ शिंदे ठाणे या पुढे कुठे फार लक्ष देण्याच्या विचारात नाहीत. तरीही देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे राज्यात फिरत आहेत. ठाकरे बंधू नाशिक आणि ठाण्याला टाकणे टाकायचे म्हणून जाऊन आले. मुंबईत पैसा आहे. जागतिक शहर आहे. देशाची आर्थिक राजधानी आहे. सबब ती ताब्यात ठेवण्यासाठी ही सगळीच मंडळी धपडत आहेत. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे आज मराठी मराठी करत आहेत. मुंबई राज्यापासून तुटण्याची चिंता करत आहेत. संस्कृती, परंपरा याचा मुद्दा कळकळीने मांडत आहेत. मात्र, गेल्या  पंचवीस वर्षात आणि त्या पूर्वी ठाकरे यांनी काय केले, हा प्रश्न विचारला जाणारच. अर्थात त्या प्रश्नाला उत्तर नाही आणि आता ती वेळ पुन्हा येणार नाही. मात्र, मुंबई आणि मराठी माणसासाठी ठाकरे बंधू आणि त्यांचे सुपुत्र जो टाहो फोडत आहेत, तो बेगडी वाटतो हे नक्की !

राज यांनी नाशिक खेचले : राज ठाकरे यांनी त्यांचा पक्ष स्थापन केल्यावर राज्याच्या विकासाचा आराखडा जाहीर केला होता. त्यांचे १२, १३ आमदार निवडून आले होते .नाशिक महानगरपालिका त्यांच्या हातात आली होती, तर पुणे महानगरपालिकेत विरोधी पक्षनेता होता. मात्र, अत्यंत बेजबाबदार आणि धरसोडीच्या आळशी राजकारणामुळे त्यांना पुढे जात आले नाही हे वास्तव आहे. ते कार्यकर्ते ( बाळासाहेबांचे ) म्हणून चांगले होते. मात्र, नेतेपद ते निभावू शकले नाहीत. ती त्यांची क्षमता नाही.  एकूणच सगळे पक्ष केवळ मुंबई, पैसा, सत्ता एवढ्यासाठी लढत आहेत. राज्याकडे फार कमी लक्ष त्यांचे आहे. मतदार सूज्ञ आहे, तो योग्य निर्णय घेईलच किंवा त्याचा निर्णय योग्य म्हणावा लागेल एवढेच ! महानगरपालिकांमध्ये ठाकरे बंधूंची जर ताकद दिसली नाही, तर जिल्हा परिषदांमध्ये काय दिसणार हा खरा विषय आहे. एक संपलेला ब्रँड असे म्हणत त्यांच्याकडे पाहत बसायचे काय?

# राज ठाकरे म्हणजे हाताची घडी, तोंडावर बोट!

हॅलो प्रभात



मतदानाला एक दिवस बाकी असताना बुधवारी राज ठाकरे यांनी पत्रकारांपुढे काही प्रश्न उपस्थित केले. त्यांची उत्तरे पाहिली तर कोणतेही परिस्थिती किंवा वस्तुस्थिती न पाहता केवळ आकाशात वावड्या उडवणे, एवढे तत्त्व राज ठाकरे यांनी पाळल्याचे दिसते. मुळामध्ये एखादा प्रश्न उपस्थित झाला तर त्याच्या बुडापर्यंत जाणे महत्त्वाचे असते, पण राज ठाकरे यांना ते कधीच मान्य नसते.

**मतदानाच्या वेळेचा मुद्दा**

राज ठाकरे यांनी मोठा मुद्दा उपस्थित केला तो म्हणजे प्रचारसभांची वेळ संपल्यानंतर एक दिवस मोकळा ठेवला जातो. पण यावेळी आदल्या दिवशी सुद्धा प्रचाराला मुभा देण्यात आल्याचा फतवा निवडणूक आयोगाने काढला. या मुद्द्यावर निवडणूक आयोगाने चांगलीच चपराक दिली आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार प्रचार संपल्यानंतर उघडपणे माईक लावून वाजत गाजत प्रचार करणे हे पहिल्या निवडणुकीपासून बंद आहे. पण घरोघरी प्रचार करणे किंवा पाचपेक्षा जास्त माणसांनी एकत्र न येता मतदारांना भेटणे हे अधिकृत आहे.. या मुद्द्यावर राज ठाकरे तोंडावर पडले.

**राज ठाकरे यांचा दुसरा मुद्दाही वांझोटा..**

ईव्हीएम मशीनला 'पाडू' नावाची यंत्रणा जोडणार असल्याचा आरोप राज ठाकरे यांनी केला. अचानक असा निर्णय निवडणूक आयोग कसा घेऊ शकते यामध्ये काहीतरी काळेबेरे आहे, असा मुद्दा राज यांनी उपस्थित केला. तथापि, निवडणूक आयोगाने सांगितले, की एखाद्या ईव्हीएम मध्ये काही बिघाड झाला तर ती वेळ मारून नेण्यासाठी 'पाडू' चा उपयोग केला जातो. सरसकट कुठेही लावले जाणार नाही. झाले दुसऱ्या मुद्द्यावरही राज ठाकरे यांचा बार फुस्स झाला.. हे सगळे कमी की काय, या चुकीच्या माहितीवर आधारित उद्धव ठाकरे यांनी तर थेट निवडणूक आयोगालाच पत्र लिहून टाकले.

**ठाकरे बंधूंचे काय होणार?**

चुकीच्या माहितीच्या आधारे फक्त टोमणे मारायचे आणि टीका करायची एवढाच उद्योग शिल्लक असलेले ठाकरे बंधू हे त्यांचा अभ्यास नसल्यामुळे जनतेच्या मनातून उतरले आहेत. महानगरपालिकेच्या निवडणुकीत त्यांच्या अस्तित्वाचा प्रश्न आहे. पण ठाकरे आडनाव म्हणजे सर्व काही माफ आणि जनता आपल्याला डोक्यावर घेणार, या भ्रमातच ते अजून आहेत. या मुद्द्यावर काय होते नंतर पाहू च.

**उत्तरे देताना नेहमीच भंबेरी..**

राज ठाकरे यांच्यासारखे राजकारणी अभ्यास नसल्याने उत्तरे देताना अडखळतात.पण, प्रश्न मात्र एकदम बुद्धिभेद करणारे विचारतात! आता असा प्रश्न राज ठाकरेंनी विचारलाय म्हणून त्याला ट्रोलिंग किंवा त्यांच्याच शैलीत (म्हणजे 'पाणचट कोट्या' करून) इग्नोर करण्याऐवजी, ज्यांचा बुद्धिभेद करण्याचा त्यांनी प्रयत्न केला असतो, त्या सामान्य जनतेसमोर तथ्ये मांडून तो प्रश्न निकालात काढला पाहिजे. राज ठाकरेंनी नुकताच असाच एक प्रश्न विचारला : वाढवण बंदर झालं, ती गरज होती, हे मी समजू शकतो. पण, आता वाढवण बंदराच्या बाजूला एअरपोर्टही होत आहे. वाढवण विमानतळ कोणाच्या फायद्यासाठी बांधले जात आहे? त्यात मुंबईचा कार्गो पळवून मुंबई बाहेर नेणे, अदानी वगैरे अँगल टाकले आणि साहेबांचे काम झाले! 'वाढवण ला एयरपोर्टची गरज नाही' हे लोकांना पटवून देऊ शकत नाहीत, म्हणून मग संभ्रम करायची ही सोपी मोडस ऑपरेंडी !

**बुद्धिभेद करण्यासाठी काहीही..**

वाढवण बंदर पूर्ण झाल्यावर ते भारताचे सर्वात मोठे बंदर आणि जगातील टॉप-10 मेगा पोर्ट्सपैकी एक असेल. अशा प्रकल्पाला विमानतळ लक्झरी नाही, तर अनिवार्य पायाभूत सुविधा आहे. मेगा पोर्ट म्हणजे मल्टी-मोडल हब हे समीकरण आहे. आजच्या जगात मोठी बंदरे फक्त जहाजांपुरती मर्यादित नसतात. बंदर, रेल्वे, रस्ते, बुलेट-ट्रेन, विमानतळ यांचे ते एक इंटिग्रेटेड लॉजीस्टिक्स हब असते. प्रचाराला तर जात नाही, एकदा रॉटरडॅम, सिंगापूर, शांघाय ला जाऊन बघून या.

**झाले..राज ठाकरे यांचे येथेही घोडे अडले.**

इलेक्ट्रॉनिक्स, सेमीकंडक्टर्स, फार्मा, मेडिकल इक्विपमेंट, डिफेन्स उपकरणे अश्या अनेक गोष्टी समुद्राने येतात, पण पुढे हवाई मार्गे न्यावे लागतात. यासाठी जवळच विमानतळ अत्यावश्यक असतो! मुंबईला आलेला कार्गो वाढवण ला न्यायचा नाहीये साहेब, पण वाढवण ला आलेला माल पण मुंबईला न्यायचा नाहीये. जागतिक कॉर्पोरेट्स, CEO, टेक्निकल एक्स्पर्ट्स वाढवण बंदरावर येत-जात राहणार आहेत. यात आंतरराष्ट्रीय शिपिंग कंपन्या, ग्लोबल इन्व्हेस्टर्स, टेक्निकल एक्स्पर्ट्स यांची ये-जा सातत्याने असेल. त्यांनी नवी मुंबई एअरपोर्ट किंवा मुंबईवर अवलंबून राहणे अव्यवहार्य आहे. वाढवण हे अरबी समुद्रावरील सामरिक स्थान आहे. नेव्ही, कोस्ट गार्ड, लॉजिस्टिक सपोर्ट, आपत्कालीन हालचालींसाठी एअर स्ट्रिप/ एअरपोर्ट ही राष्ट्रीय सुरक्षेची गरज आहे. पण, काहीही बोल रेटून बोल, ही जी राज ठाकरे यांची अवस्था आहे, त्याचे हसू येऊ लागले आहे आणि त्यांच्या कार्यकर्त्यांच्याही ते लक्षात येत चालले असल्यामुळे त्यांच्या पक्षाला घरघर लागली आहे ! पण त्याबद्दल ते कधीच गंभीर नाहीत हे दुर्दैव आहे ! एखादा मनोरंजनाचा कार्यक्रम असल्यासारखी त्यांची जाहीर सभा आता कंटाळवाणी होऊ लागली आहे. त्यांनी खरोखर राजकारण करायचे असेल तर सखोल अभ्यास करायला हवा आणि मग आपली मते मांडायला हवीत, नाहीतर अज्ञानापोटी तोंडावर पडण्याची वेळ येते. थोडक्यात काय, राज ठाकरे म्हणजे हाताची घडी, तोंडावर बोट!

# पुण्यात प्रथमच 'पॉ पेट्रोल'चा धमाल अनुभव

पुणे : हॅलो प्रभात




जगभर लोकप्रिय असलेला लहान मुलांचा प्री-स्कूल शो PAW Patrol आता प्रथमच पुण्यात दाखल होत आहे. Phoenix Marketcity Pune येथील लिबर्टी स्क्वेअरमध्ये ९ जानेवारी ते ८ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत हा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. भारतात हा उपक्रम JioStar तर्फे सादर केला जात आहे. 'ॲडव्हेंचर बे' थीमवर आधारित या कार्यक्रमात चेस, रबल, मार्शल, स्काय यांसारख्या आवडत्या पप्पी हिरोंसोबत मुलांना विविध ॲक्टिव्हिटी झोन्समध्ये सहभागी होता येणार आहे. केस सॉल्व्हिंग, कन्स्ट्रक्शन ॲक्टिव्हिटीज, फायर फ्लाइट, व्हीआर कार रेस, आर्ट्स अँड क्राफ्ट्स, स्क्रीनिंग एरिया, कॅरेक्टर मीट अँड ग्रीट अशा अनेक आकर्षक उपक्रमांचा यात समावेश आहे.

# 'भारत के सुपर फाउंडर्स' च्या ट्रेलरचे अनावरण

मुंबई : हॅलो प्रभात




ॲमेझॉनची विनामूल्य व्हिडिओ स्ट्रीमिंग सेवा Amazon MX Playerने आगामी उद्योजकांसाठीच्या रिॲलिटी सिरीज भारत के सुपर फाउंडर्सच्या ट्रेलरचे अनावरण केले आहे. या कार्यक्रमामध्ये भारतातील नव्या दमाच्या उद्योजकांसाठी ₹100 कोटींहून अधिक वास्तविक भांडवलाची तजवीज करण्यात आली आहे.


ही सिरीज १६ जानेवारी २०२६ पासून ॲमेझॉन एमएक्स प्लेयरवर मोफत स्ट्रीम होणार असून दर गुरुवार व शुक्रवार नवीन भाग प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि मार्गदर्शन सुनील शेट्टी करणार आहेत. 'भारत के सुपर फाउंडर्स'मध्ये संपूर्ण भारतातील, विशेषतः लहान शहरांतील उद्योजक त्यांच्या कल्पना थेट नामांकित उद्योगपतींच्या पॅनेलसमोर मांडणार असून, इक्विटी व कर्ज स्वरूपातील गुंतवणुकीचे निर्णय घेतले जाणार आहेत. वास्तविक गरजा, विस्तारक्षम व्यवसाय मॉडेल आणि दीर्घकालीन दृष्टीकोन यांवर आधारित उद्योजकतेला चालना देणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

रस्क मीडिया आणि रिकर क्लब निर्मित या मालिकेमुळे भारतीय स्टार्टअप विश्वाला एक विश्वासार्ह व उच्च-भागीदारीचे व्यासपीठ मिळणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

# तहसील कार्यालयांचा परिसर स्वच्छ व मोकळा करावा

■ भाजप महिला आघाडीचे तहसीलदारांना निवेदन

शिरूर : हॅलो प्रभात



शिरूर तहसील कार्यालयाच्या आवारातील साचलेली वाळू, अवैध तसेच बंद अवस्थेतील जड वाहने तात्काळ हटवून परिसर स्वच्छ व मोकळा करण्यात यावा, अशी मागणी भाजप महिला आघाडी, शिरूर शहर यांच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात भाजप महिला आघाडीच्या अध्यक्षा प्रियाताई लोकेश बिरादार यांनी तहसीलदार श्री. बाळासाहेब म्हस्के यांना निवेदन सादर केले.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, दरवर्षी ऑगस्ट महिन्यात स्वातंत्र्यदिन व जानेवारी महिन्यात प्रजासत्ताक दिनानिमित्त शिरूर तहसील कार्यालयाच्या आवारात ध्वजारोहण व विविध सार्वजनिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. या कार्यक्रमांच्या वेळी नागरिकांना बसण्यासाठी व कार्यक्रम सुरळीत पार पाडण्यासाठी स्वच्छ व मोकळ्या जागेची नितांत गरज असते. मात्र सध्या आवारात उभ्या असलेल्या वाहनांमुळे व अस्वच्छतेमुळे पुरेशी जागा उपलब्ध होत नसून नागरिकांना गैरसोयींना सामोरे जावे लागत आहे.

तसेच तहसील कार्यालयात दररोज शिरूर तालुक्यातील अनेक नागरिक विविध शासकीय कामकाजासाठी येत असतात. मात्र वाहन पार्किंगसाठी योग्य व्यवस्थेचा अभाव असल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. तहसील आवारात मोठ्या प्रमाणावर वाळू साचलेली असून काही अवैध तसेच बंद अवस्थेतील जेसीबी व इतर जड वाहने अनेक दिवसांपासून तिथेच उभी असल्याने परिसर अस्वच्छ दिसत आहे. यामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेचाही प्रश्न निर्माण झाला आहे.

या पार्श्वभूमीवर तहसील कार्यालयाच्या आवारातील वाळू तात्काळ हटवून अवैध व बंद पडलेली वाहने काढून परिसर स्वच्छ व मोकळा करण्यात यावा, अशी नम्र विनंती निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. याबाबत तहसील प्रशासन सकारात्मक कार्यवाही करेल, अशी अपेक्षा भाजप महिला आघाडीच्या वतीने व्यक्त करण्यात आली.

यावेळी भाजप महिला आघाडीच्या शिरूर शहर उपाध्यक्षा सुष्ट्री करंजुले व निलमधु शर्मा उपस्थित होत्या.

# मोठ्या संकल्पांपेक्षा साध्या सवयींना अनन्या पांडेचे प्राधान्य

मुंबई : हॅलो प्रभात



अभिनेत्री अनन्या पांडे हिने २०२६ मध्ये पाऊल ठेवताना मोठे ठराव न करता साध्या, शाश्वत सवयी अंगीकारण्यावर भर दिला आहे. एका नव्या इंस्टाग्राम रीलमध्ये तिने आरशासमोर स्वतःशी संवाद साधत 'नवीन वर्ष, नवीन मी' या संकल्पनेसोबत येणाऱ्या तणावावर प्रामाणिकपणे भाष्य केले आहे. अशक्य मानकांचा पाठलाग करण्याऐवजी चांगली झोप, पुरेसे पाणी पिणे आणि नियमित व्यायाम यांसारख्या लहान पण सातत्यपूर्ण सवयी महत्त्वाच्या असल्याचे ती सांगते. परिपूर्णतेपेक्षा सातत्य महत्त्वाचे असल्याचा तिचा संदेश अनेकांना आपलासा वाटत आहे. रीलमध्ये अनन्या तिच्या सकाळच्या दिनचर्येतील एक साधी सवयही शेअर करते—दिवसाची सुरुवात मूठभर कॅलिफोर्निया बदामांनी करणे. ऊर्जेचा नैसर्गिक स्रोत असलेले बदाम त्वचेच्या आरोग्यासाठीही उपयुक्त ठरू शकतात, असे ती नमूद करते.

# १७ व १८ जानेवारी रोजी 'लग्नपंचमी' रंगभूमीवर

पुणे : हॅलो प्रभात



लेखिका मधुगंधा कुलकर्णी आणि दिग्दर्शक निपुण धर्माधिकारी यांच्या संकल्पनेतून साकारलेले धमाल विनोदी मराठी नाटक 'लग्नपंचमी' १७ व १८ जानेवारी रोजी पुण्यात रंगभूमीवर येत आहे. या नाटकात स्वप्नील जोशी बारा वर्षांनंतर रंगभूमीवर पुनरागमन करत असून अमृता खानविलकर यांचे हे पहिलेच मराठी नाटक आहे. शुभारंभाचे प्रयोग शनिवार, १७ जानेवारी रोजी सायं. ५ वाजता यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, कोथरूड येथे, तर रविवार, १८ जानेवारी रोजी दुपारी १२ वाजता टिळक स्मारक मंदिर आणि सायं. ५.१५ वाजता बालगंधर्व रंगमंदिर, पुणे येथे होणार आहेत.

# निःपक्ष काम करुन निवडणुका सुरळीत पार पाडा : संतोष पाटील

सातारा : हॅलो प्रभात

सूर्यकांत पाटणकर




जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक पादर्शक, भयमुक्त व निष्पक्ष वातावरणात पार पाडावी. यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे. आचार संहितेच्या कालावधीत सर्व शासकीय अधिकारीव कर्मचारी यांची वर्तणुक निष्पक्ष असेल याची प्रत्येकाने काटेकोरपणे दक्षता घ्यावी. कोणत्याही परिस्थितीत पक्षपाती वर्तणुकीची तक्रार खपवून घेतली जाणार नाही, असे निर्देश जिल्हाधिकारी संतोष पाटील यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनात जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुक तयारी, आदर्श आचारसंहिता व कायदा सुव्यवस्थेच्या अंमलबजावणीबाबत आढावा घेण्यात आला. या आढावा बैठकीला मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, पोलीस अधीक्षक तुषार दोशी, जलसंपदा विभागाचे अधीक्षक अभियंता अभय काटकर, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता संतोष रोकडे, अपर पोलीस अधीक्षक वैशाली कडूकर, उपजिल्हाधिकारी (महसूल) विक्रांत चव्हाण, निवासी उपजिल्हाधिकारी नागेश पाटील आदी उपस्थित होते.

जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीच्या अनुषंगाने विविध यंत्रणांवर जबाबदारी देण्यात आली आहे ही जबाबदारी पारदर्शकपणे पार पाडावी, असे निर्देश देऊन जिल्हाधिकारी श्री. पाटील म्हणाले, निवडणूक कालावधीमध्ये आपण राज्य निवडणूक आयोगाचे अधिकारी, कर्मचारी म्हणून काम करीत असतो याचे भान ठेवून प्रत्येकाने आपली जबाबदारी जबादारीने पार पाडावी. प्रत्येकाच्या हातात कॅमेरे आल्याने कोणतीही चुक लपून राहत नाही तसेच ती तात्काळ लोखो लोकांपर्यंत पोहचते, मुळे कामकाज करत असताना चुका टाळाव्यात. तसेच निवडणूक लढविणाऱ्या सर्व उमेदवारांना समान संधी उपलब्ध करुन द्यावी. ज्या ठिकाणी अवैध प्रकार आढळल्यास तात्काळ कारवाई करा.

विविध परवान्यांसाठी एक खिडकी योजना आजच सुरु करावी. स्थिर व फिरते पथकांची नियुक्ती करावी, असे निर्देश देऊन जिल्हाधिकारी श्री. पाटील म्हणाले, जिल्हा परिषदेकडील अधिनस्त इमारतींवरील राजकीय पक्षांचे प्रमुखांची छायाचित्रे, बॅनर, साहित्य काढून घ्यावे. त्यांचे ऑडीट जिल्हा परिषदेकडील बांधकाम विभागामार्फत करुन प्रमाणीत करुन घ्यावे  व त्याचा अहवाल निवडणूक आयोगाला द्यावा.

नवे विचार...नवी सुरुवात
दैनिक हॅलो प्रभात

■ दैनिक **हॅलो प्रभात** हे पत्रक, मुद्रक शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक व मालक गणेश बंडा पाटील यांच्याकरिता, मे. कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२ महावीरनगर, सांगली – ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथे छापून **दैनिक हॅलो प्रभात**, कार्यालय, **स.न.१४/१५/२/३, फ्लॅट नं.२०, शिवपुष्प, ए पार्क, वडगाव बु., पुणे– ४११०४१. (महाराष्ट्र)** येथून प्रसिद्ध केले.
■ **पुणे कार्यालय :** १६७७, सदाशिव पेठ, अमित रेसिडेन्सी, एस.पी. कॉलेज जवळ, पुणे–४११०३० ■ **पुणे संपर्क : ८५५१०५५११३**
■ **कोल्हापूर कार्यालय :** एस ९४६, GF-7, गुलमर्ग अपार्टमेंट, सरनाईक कॉलनी, शिवाजी पेठ, कोल्हापूर–४१६००२
■ **सांगली मुख्य कार्यालय :** कल्पकुंज विहार, एस.टी. स्टँड रोड, सांगली. ■ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. (सांगली न्यायकक्षेत)
■ मुख्य संपादक : गणेश पाटील-सावर्डेकर ■ संपादक : संजीव शाळगावकर

हॅलो प्रभात
MY CITY

गुरुवार, दि. १५ जानेवारी २०२६

# मनोरमा खेडेकर यांचा शस्त्र परवाना रद्द; असमाधानकारक ठरल्याने कारवाई

**पुणे : हॅलो प्रभात** : वादग्रस्त सनदी अधिकारी पूजा खेडेकर यांच्या आई मनोरमा खेडेकर यांचा शस्त्र परवाना पुणे पोलिसांनी रद्द केला आहे. पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी याबाबतचे आदेश दिले आहेत. मनोरमा खेडेकर यांच्याविरोधात 2024 मध्ये पौड पोलीस ठाण्यात एका शेतकऱ्याला पिस्तुलाचा धाक दाखवून धमकावल्याचा गुन्हा दाखल आहे. या घटनेचा व्हिडीओ समाजमाध्यमांवर व्हायरल झाल्यानंतर पुणे ग्रामीण पोलिसांकडून गुन्हा दाखल करण्यात आला होता. याशिवाय नवी मुंबईतील रबाळे पोलीस ठाणे तसेच चतु:शृंगी पोलीस ठाण्यातही त्यांच्याविरोधात विविध कलमान्वये गुन्हे नोंद आहेत. या पार्श्वभूमीवर पोलिसांनी मनोरमा खेडेकर यांना शस्त्र परवाना रद्द का करू नये, अशी कारणे दाखवा नोटीस बजावली होती. मात्र अनेकदा नोटीस देऊनही त्यांनी समाधानकारक खुलासा सादर केला नाही. काही दिवसांपूर्वी त्यांनी पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांची भेट घेऊन आपल्याला जीवित धोका असल्याचे सांगितले होते. त्यानंतर सादर केलेला खुलासा पोलिसांना असमाधानकारक वाटल्याने अखेर ही कारवाई करण्यात आली. पोलिस आयुक्तांनी आदेशात नमूद केले आहे की, मनोरमा खेडेकर यांचे वर्तन गुन्हेगारी प्रवृत्तीचे असून कायदा व सुव्यवस्थेस धोका निर्माण करणारे आहे. भविष्यात शस्त्राचा गैरवापर होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे त्यांच्या कुटुंबीयांसह सर्वसामान्य नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण होऊ शकतो. दरम्यान, शस्त्र परवाना रद्द करण्याच्या निर्णयाविरोधात 26 जानेवारी रोजी आंदोलन व आमरण उपोषण करण्याचा इशारा मनोरमा खेडेकर यांनी दिला आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### इंधन पंपांवरच मिळणार वाहन सेवा

**मुंबई : हॅलो प्रभात**

Indian Oil Corporation Limited आणि Maruti Suzuki India Limited यांनी ग्राहकांच्या सोयीसुविधा वाढवण्यासाठी सामंजस्य करार (MoU) केला आहे. या करारानुसार देशभरातील काही निवडक इंडियन ऑइल इंधन पंपांवर मारुती सुझुकीच्या वाहन सेवा सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. या उपक्रमामुळे ग्राहकांना इंधन भरण्याच्याच ठिकाणी मारुती सुझुकी कारची नियमित देखभाल व किरकोळ दुरुस्ती सेवा मिळणार असून, “वन-स्टॉप” समाधान मिळेल. इंडियन ऑइलच्या ४१ हजारांहून अधिक इंधन पंपांच्या नेटवर्कचा लाभ घेऊन मारुती सुझुकीची विक्रीनंतरची सेवा आणखी सुलभ होणार आहे. या सहकार्यातून ग्राहकांचा वेळ वाचणार असून वाहन मालकीचा अनुभव अधिक सोपा, सोयीस्कर आणि विश्वासार्ह होईल, असा विश्वास दोन्ही कंपन्यांनी व्यक्त केला आहे.

### निवडणुक यंत्रणा सज्ज; ६४ हजार कर्मचारी ; २२ हजार पोलीस तैनात

**मुंबई : हॅलो प्रभात**

मुंबई महापालिका निवडणुकीसाठी मुंबई महापालिकेची संपूर्ण यंत्रणा सज्ज झाली आहे. निवडणुकीसाठी ६४,३७५ कर्मचारी-अधिकारी, ४,५०० स्वयंसेवकांची तसेच २२ हजार पोलीस नियुक्ती करण्यात आले आहेत. मुंबई महानगरपालिका मुख्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. मुंबई महापालिका निवडणुकीसाठी १५ जानेवारीला मतदान, तर १६ जानेवारीला मतमोजणी होणार आहे. निवडणुकीच्या रिंगणात १७०० उमेदवार आहेत. निवडणुकीची संपूर्ण तयारी पालिकेकडून पूर्ण झाली आहे. मतदान केंद्रावर लागणारी यंत्रणा, सोयीसुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत. ८० हजार कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले असून सध्या ६४ हजार कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत.

# अवैध गुटखा विक्रीचा सुळसुळाट !

■ प्रशासनाची कारवाई ठरली फुसका बार : कारवाई होऊन साध्य झाले काय?

**पुणे : हॅलो प्रभात**

सोमनाथ साळुंके

सध्या शहरातील विविध भागात बेकायदेशीर गुटखा विक्रेत्यांवर प्रशासनाच्या वतीने छापे मारून देखील अनेक विक्रेते हे गुटख्याची सर्रासपणे गुटख्याची विक्री मोठ्या प्रमाणात करण्यात येत असल्याने प्रशासनाच्या वतीने करण्यात आलेली कारवाई फुसका बार ठरून सुरू असलेले अनधिकृत गुटखा विक्रीचे व्यवसाय कोणाच्या आशीर्वादाने सुरू आहेत.हा प्रश्न नागरिकांना सतावत आहे.

सध्या शहरातच नाही तर राज्यभर गुटखा विक्रीवर राज्य शासनाच्या वतीने बंदीचे आदेश असतांना देखील शहरासह उपनगर भागात सर्रासपणे खुलेआमपणे गुटख्याची विक्री होतानाचे चित्र पाहायला मिळत आहे. कारण पण टपरीच्या नावाखाली हे धंदे सुरु असतांना देखील पोलीस यंत्रणा अशा व्यावसायिकांवर कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यास टाळाटाळ करत असल्यामुळे संबंधीत व्यावसायिक व पोलीस यांच्यामध्ये महिन्यामध्ये अर्थपूर्ण चर्चा होत असल्याचा शंका उपस्थित होऊन महिना




दिड महिन्यापूर्वी अनधिकृत गुटखा विक्रेत्यांना रडारवर ठेऊन शहरातील ग्रामीण भागांसह शहरी भागातील गुटखा विक्रेत्यांच्या गोडाऊनवर प्रशासनाच्या वतीने छापे मारून अशा व्यावसायिकावर कारवाईची धडक मोहीम राबविण्यात आली होती.यामुळे झालेल्या कारवाईमुळे अनेक शहरातील अनेक व्यावसायिकांना कारवाईबाबत हादरे बसले असून बहुतांश प्रमाणात व्यावसायिकांच्या मनात धडकी भरल्याने काही व्यावसायिकांनी हे व्यवसाय बंद करून अलिप्त राहण्यास पसंती दिली असताना देखील हे धंदे शहरातील अनेक भागात खुलेआमपणे सुरू असून सुरू असलेले गुटखा विक्रीचा व्यवसाय कोणाच्या आशीर्वादामुळे सुरू आहे.या संभ्रमात व्यसनापासून दूर असलेले नागरिक पडले आहेत.

विशेष म्हणजे ज्या बालवयात शिक्षणाकडे लक्ष केंद्रित करण्याची गरज असतांना अशा बालवयातच अनेक शालेय विद्यार्थी हे अंमली पदार्थ असलेल्या सिगारेट

**येरवडा,विश्रांतवाडी,धानोरी,लोहगाव,वडगाव शेरी,खराडी आदी भागात जवळपास एका हजाराहून अधिक पान टपऱ्यांची दुकाने असून त्याच्या नावाखाली सर्रासपणे गुटख्याची विक्री होत असल्याचे निदर्शनास येत असून अनधिकृतपणे गुटख्याची विक्री करणाऱ्या अशा पान टपरी व्यावसायिकांवर कारवाई न होणे ही आश्चर्याची बाब आहे. आज राज्यभर प्रशासनाच्या वतीने गुटखा बंदीवर आदेश दिले असताना देखील व्यावसायिक हे कायद्याच्या नियमांची खुलेआमपणे पायमल्ली करून गुटख्याची विक्री करत असतांना देखील आजपर्यंत प्रशासनाच्या वतीने अशा व्यावसायिकांवर कारवाई होत नसल्याने आश्चर्य वाटत असून युवकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला असून तात्काळ अशा व्यावसायिकांवर कारवाई ही काळाची गरज आहे.**

गुटख्याच्या आहारी गेल्यामुळे त्यांचा आरोग्याचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. विशेष करून अशा विक्रेत्यांना शाळेच्या आवारात अंमली पदार्थ विक्री करण्याची परवानगी नसताना देखील ते विक्री करत असल्याने कुंपणच शेत खातंय अशी अवस्था प्रशासनाची झाली आहे.तर काही ठिकाणी अनेक पोलिस स्टेशनच्या अशा प्रकारच्या गुटख्याची सर्रासपणे गुटख्याची विक्री होत असल्याचे निदर्शनास येत आहे. विशेष करून पान टपरीच्या नावाखाली अनेक ठिकाणी सिगारेटसह आरएमडी,विमल यासारख्या अमली पदार्थांची सर्रासपणे विक्री होत आहे. यामुळे नागरिकांमध्ये आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे. तर विश्रांतवाडी-आळंदी मार्गावर देखील अशा अमली पदार्थांची खुलेआमपणे विक्री होतानाचे चित्र नेहमीच दिसून येत आहे. कारण येथील मुख्य चौकातच रस्त्यावरील भिंती ह्या गुटख्याच्या पिचकाऱ्यानी रंगलेल्या दिसून येत असून याचा नाहक त्रास ज्येष्ठ नागरिकांसह महिला वर्गांना सहन करण्याची वेळ आली आहे. एखादी ज्येष्ठ नागरिक एका बालकास यासंदर्भात समजावण्याचा प्रयत्न केला तर त्यांच्या दहशतीचा सामना त्यांना कारणांची वेळ येत असल्यामुळे याविरोधात उठविण्यास अनेकांनी धास्ती घेतली असून या भागातील अनेक तरुण हे गुटख्याच्या आहारी गेल्यामुळे कॅंसर या महाभयंकर आजाराला ते निमंत्रण देत आहेत. तर अनेकांचे यामुळे संसार ही उध्वस्त झाल्यामुळे यासाठी समाजातील तरुणांनी युवकांमध्ये जनजागृती करणे गरजेचे असल्याचे रावते यांनी सांगितले.

# आज मतदान, उद्या निकाल

## पिंपरी महापौर आरक्षण अद्याप जाहीर नाही

**पिंपरी : हॅलो प्रभात**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या निवडणुकीसाठीचा प्रचार मंगळवारी (दि. 13) सायंकाळी संपला आहे. आज, गुरुवारी (दि. 15) मतदान होणार असून उद्या, शुक्रवारी मतमोजणी होणार आहे. मात्र, मतदानाच्या आदल्या दिवशीही महापौर पदाचे आरक्षण अद्याप जाहीर न झाल्याने शहराच्या राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.

शहरातील लोकसंख्या, महापौर आरक्षण लागू झाल्यापासूनचा तपशील आदी माहितीचा अहवाल पिंपरी-चिंचवड महापालिकेने सप्टेंबर 2025 मध्ये राज्य शासनाकडे पाठवला आहे. या अहवालात 2001 पासून आतापर्यंत महापौर पदासाठी लागू असलेले आरक्षण, त्याचा कालावधी, आरक्षण संपुष्टात आलेल्या प्रवर्गांची माहिती तसेच 2011 च्या जनगणनेनुसार लोकसंख्येचा तपशील समाविष्ट आहे. मात्र, अद्यापही राज्य शासनाच्या नगरविकास विभागाकडून महापौर पदाचे आरक्षण जाहीर करण्यात आलेले नाही.

आतापर्यंत पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या महापौर पदासाठी खुला प्रवर्ग, नागरिकांचा मागास प्रवर्ग (ओबीसी) आणि अनुसूचित जमाती (एसटी) या प्रवर्गांना संधी




**महापौर पदाचे आरक्षण राज्य शासनाच्या नगरविकास विभागामार्फत जाहीर केले जाते. मात्र, अद्याप आरक्षण जाहीर न झाल्याचे राज्य निवडणूक आयोगाचे आयुक्त दिनेश वाघमारे यांनी स्पष्ट केले आहे. त्यामुळे मतदान होत असताना महापौर आरक्षणाबाबतची अनिश्चितता कायम आहे.**

मिळाली आहे. खुल्या प्रवर्गातून प्रकाश रेवालकर, डॉ. वैशाली घोडेकर, अर्पणा डोके, नितीन काळजे, राहुल जाधव (ओबीसी), तर महिला खुल्या प्रवर्गातून मंगला कदम, मोहिनी लांडगे, उषा ढोरे आणि अनुसूचित जमाती प्रवर्गातून शकुंतला धराडे यांनी महापौरपद भूषविले आहे. आता केवळ अनुसूचित जाती (एससी) प्रवर्गाचे आरक्षण शिल्लक असल्याने महापौर पद एससीसाठी आरक्षित होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## स्वामी विवेकानंद जयंती उत्साहात साजरी

**पुणे : हॅलो प्रभात**

गेनबा सोपानराव मोझे संस्थेच्या, वडमुखवाडी येथील श्री. सयाजीनाथ महाराज विद्यालयात राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी विद्यालयाचे प्राचार्य श्री. राजकुमार गायकवाड सर यांच्या हस्ते प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी प्राचार्यांसमवेत विभाग प्रमुख श्रीम. नीलम नाईक तसेच इतर शिक्षक उपस्थित होते.

त्यानिमित्ताने आयोजित कार्यक्रमात विद्यालयातील इयत्ता ९ वी . तील विद्यार्थिनी कु. ज्ञानेश्वरी घाटुळे हिने राजमाता जिजाऊ यांची वेशभूषा करून आपले मनोगत व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून भविष्यात वाटचाल करावी असे प्राचार्य श्री. राजकुमार गायकवाड यांनी यावेळी आपल्या



भाषणात सांगितले. विद्यालयातील सहशिक्षक श्री. शिरीष कुमार सूर्यवंशी यांनीही राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या विषयी आपले मनोगत व्यक्त केले. राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माजी आमदार श्री. रामभाऊ मोझे साहेब, संस्थेचे उपाध्यक्ष ज्ञानेश्वर मोझे, संस्थेच्या सदस्या प्रा.श्रीम.अलकाताई पाटील यांनी सर्व विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे आभार विद्यालयातील क्रीडा शिक्षक संजय जैनक यांनी मानले.

## भव्य आणि नाविन्यपूर्ण फॅशन शो संपन्न



**मुंबई: हॅलो प्रभात**

Blenders Pride फॅशन टूर 2025 हा गुरुग्राम, जयपूर आणि कोलकाता या तीन शहरांमध्ये भव्य आणि नाविन्यपूर्ण फॅशन शोसह यशस्वीपणे संपन्न झाला. इमर्सिव्ह कथाकथन, अत्याधुनिक डिझाइन आणि ‘द वन अँड ओन्ली’ या संकल्पनेतून या टूरने भारतातील फॅशन अनुभवांना नवे मापदंड दिले.

गुरुग्राममध्ये डिझायनर Falguni Shane Peacock यांनी सादर केलेल्या ‘द फ्युचरव्हर्स ऑफ फॅशन’ शोमध्ये तंत्रज्ञान आणि कुट्युअरचा संगम पाहायला मिळाला. या शोमध्ये शाहिद कपूर आणि तमन्ना भाटिया झळकले.

जयपूरमध्ये ‘हाय ऑक्टेन कुट्युअर’ संकल्पनेत डिझायनर Namnata Joshipura आणि Abhishek Patni यांनी मोटरस्पोर्ट प्रेरित फॅशन सादर केली. या शोमध्ये Harnaaz Sandhu आणि Raftaar यांची उपस्थिती लक्षवेधी ठरली.

कोलकात्यातील अंतिम शोमध्ये Anamika Khanna यांनी ‘फ्युचर इज क्राफ्टेड’ ही संकल्पना साकारली. शोस्टॉपर म्हणून ईशान खट्टर झळकले आणि हावडा ब्रिजच्या पार्श्वभूमीवर हुगळी नदी फॅशनच्या रंगमंचात रूपांतरित झाली.

Pernod Ricard India आणि Fashion Design Council of India यांच्या सहकार्याने साकारलेल्या या टूरला तीन शहरांमध्ये २१०० हून अधिक मान्यवरांची उपस्थिती लाभली. फॅशन कधीही थांबत नाही, तर स्वतः पुढे सरकते, हा ठाम संदेश देत ब्लेंडर्स प्राईड फॅशन टूर 2025 ने भारतातील फॅशनच्या भविष्यासाठी नवी दिशा निश्चित केली.

## श्री सयाजीनाथ विद्यालयाचा प्रथम क्रमांक

**पुणे : हॅलो प्रभात**

गेनबा सोपानराव मोझे संस्थेच्या वडमुखवाडी येथील श्री. सयाजीनाथ महाराज विद्यालयाने इंडियन रेड क्रॉस सोसायटी पुणे जिल्हा विभागामार्फत घेण्यात आलेल्या राष्ट्रीय गीत व रेड क्रॉस समूहगीत स्पर्धेत इ .८ वी ते १० वी या मोठ्या गटात प्रथम क्रमांक तर इ.४ थी ते ७ वी गटात द्वितीय क्रमांक पटकावला आहे . दि.११ जानेवारी ,२०२६ रविवार रोजी डॉ. सायरस पूनावाला कर्णबधिर मुलांचे विद्यालय , लुल्लानगर ,पुणे या ठिकाणी या स्पर्धा संपन्न झाल्या .यावेळी इंडियन रेडक्रॉस सोसायटीचे अध्यक्ष डॉ.शंतनु गोखले ,तसेच इतर मान्यवर



उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माजी आमदार रामभाऊ मोझे, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर मोझे, संस्थेच्या सदस्या प्रा.श्रीम.अलकाताई पाटील, विद्यालयाचे प्राचार्य राजकुमार गायकवाड, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक सुधीर शिंगटे यांनी अभिनंदन केले.




प्रकाशक- महेंद्र पठारे मुद्रक- चैतन्या प्रिंटर्स प्रती- १०००

हॅलो प्रभात
# अहिल्यानगर
जिल्हा विशेष
गुरुवार, दि. १५ जानेवारी २०२६






## थोडक्यात पण महत्वाचे




### नगर-शिर्डी महामार्गाच्या कामासाठी राहू-केतूला अभिषेक

**राहुरी : हॅलो प्रभात**

नगर-शिर्डी महामार्गाचे रखडलेले काम लवकर पूर्ण व्हावे यासाठी राहुरीतील व्यापारी असोसिएशन व संतप्त नागरिकांनी मकर संक्रांतीच्या दिवशी राहू-केतू महाराज मंदिरात अभिषेक घातला. प्रशासकीय अनास्था व ठेकेदारांच्या दिरंगाईमुळे त्रस्त झालेल्या नागरिकांनी 'अध्यात्मिक मार्गाने' आंदोलन केल्याने जिल्हाभरात चर्चा रंगली आहे. रस्त्यावरील खड्डे, धूळ, अपघातांचे वाढते प्रमाण आणि वाहतूक कोंडीमुळे नागरिक व व्यापाऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. यावेळी रस्त्याची रुंदी ३० मीटर करावी, रखडलेले काम तातडीने पूर्ण करावे आणि अपघात टाळण्यासाठी तांत्रिक त्रुटी दूर कराव्यात, अशी मागणी करण्यात आली. या अभिषेकावेळी व्यापारी, सामाजिक कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

### विजेचा शॉक लागून एकाचा मृत्यू तर एक जखमी

**कोपरगांव : हॅलो प्रभात**



मकरसंक्रांतीनिमित्त पतंग उडवताना धोकादायक बायडिंग तार वीज वाहिनीस लागल्याने १५ वर्षीय अर्णव महेश व्यवहारे याचा हाय-व्होल्टेज शॉक लागून जागीच मृत्यू झाला. या घटनेत ऋषिकेश संजय वाघमारे (वय १५) हा गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. ही घटना लक्ष्मी नगर भागात घडली. प्रशासनाने धोकादायक तारांचा वापर टाळण्याचे आवाहन केले आहे.




### एकनाथ माध्यमिक विद्यालयाचे चित्रकला ग्रेड परीक्षेत यश

**शेवगाव-अजय नजन : हॅलो प्रभात**

एकनाथ माध्यमिक विद्यालय, एरंडगाव येथील विद्यार्थ्यांनी शासकीय चित्रकला ग्रेड परीक्षा २०२५-२०२६ मध्ये घवघवीत यश संपादन केले असून विद्यालयाचा निकाल शंभर टक्के लागला आहे. अतिवृष्टी व पूरपरिस्थितीमुळे सप्टेंबरऐवजी नोव्हेंबर २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या एलिमेंटरी व इंटरमिजिएट ग्रेड परीक्षांचा निकाल दि. १० जानेवारी २०२६ रोजी जाहीर झाला. या परीक्षेसाठी एलिमेंटरी ग्रेडसाठी २८ तर इंटरमिजिएट ग्रेडसाठी १६ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले. एलिमेंटरी ग्रेडमध्ये ए श्रेणीत कु. अल्फीया आयाज पठाण व कु. समृद्धी आबासाहेब सुपेकर, बी श्रेणीत कु. सातपुते तनुजा विष्णू तर सी श्रेणीत २५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. इंटरमिजिएट ग्रेडमध्ये "ए" श्रेणीत कु. अंजली कृष्णा भागवत, प्रियांशी रामेश्वर धस, सिफा चांद शेख व श्रुतिका संदीप भागवत, "बी" श्रेणीत कु. श्रुतिका संदीप राऊत, कु. रुपाली मुकुंद कताडे व कु. पूजा शिवाजी निकाळजे तर "सी" श्रेणीत ९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.या यशस्वी विद्यार्थ्यांना कलाशिक्षक मुकुंद आरे यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल समता जोगेश्वरी मंडळाचे संस्थापक कॉ. कृष्णनाथ पवार, अध्यक्षा श्रीमती वैशाली मोरे, सचिव बबनराव पवार, मुख्याध्यापक माधवराव काटे तसेच शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

## कै. प्रभाकर पुलवळे यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन

**जामखेड : हॅलो प्रभात**



जामखेड-साकत येथील ग्रामपंचायत कार्यालयात शिपाई पदावर निष्ठेने व प्रामाणिकपणे सेवा बजावणारे कै. प्रभाकर निवृत्ती पुलवळे यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त साकत येथे भावपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास त्यांचे कुटुंबीय, नातेवाईक तसेच साकत ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रथम पुण्यस्मरणानिमित्त सकाळी १० ते १२ या वेळेत ह.भ.प. अशोक महाराज भोसले यांचे अमृततुल्य कीर्तन संपन्न झाले. कीर्तनाच्या माध्यमातून कै. प्रभाकर पुलवळे यांच्या साध्या, संस्कारशील, सेवाभावी आणि कर्तव्यनिष्ठ जीवनप्रवासावर प्रकाश टाकण्यात आला. कै. प्रभाकर निवृत्ती पुलवळे हे अत्यंत शांत, संयमी, कष्टाळू व धार्मिक वृत्तीचे व्यक्तिमत्त्व होते. बोलण्यात कमी आणि कृतीतून अधिक माणुसकी जपणारे म्हणून ते सर्वांच्या स्मरणात होते. त्यांनी आपल्या आयुष्यात कुटुंबातील प्रत्येक सदस्यावर चांगल्या संस्कारांची शिदोरी दिली. त्यांच्या नम्र स्वभावामुळे, प्रेमळ वागणुकीमुळे आणि सर्वांना सोबत घेऊन चालण्याच्या वृत्तीमुळे संपूर्ण साकत पंचक्रोशीत त्यांना विशेष मान-सन्मान प्राप्त झाला होता.

त्यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी कधीही न भरून निघणारी असली, तरी त्यांनी दिलेले संस्कार, माणुसकीची शिकवण आणि सेवाभावाची परंपरा सदैव स्मरणात राहील, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली. प्रथम पुण्यस्मरणानिमित्त ग्रामस्थांनी एकत्र येत त्यांच्या पवित्र आठवणींना उजाळा दिला व त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो, अशी सामूहिक प्रार्थना करण्यात आली.

या कार्यक्रमास जामखेड पंचायत समितीचे माजी सभापती डॉ. भगवान मुरुमकर, ह.भ.प. उत्तम महाराज वराट, दिनकर मुरुमकर, त्रिंबक पुलवळे, दादा घोडेस्वार, मनोज पुलवळे, पत्रकार बापुसाहेब घोडेस्वार, रोहित घोडेस्वार, रामभाऊ मुरुमकर, माजी सरपंच कांतिलाल वराट, संपत पुलवळे, दत्तात्रय पुलवळे, महादेव पुलवळे, नागराज मुरुमकर, कृष्णा पुलवळे यांच्यासह अनेक ग्रामस्थ व कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी कै. प्रभाकर निवृत्ती पुलवळे यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या पवित्र स्मृतींना श्रद्धांजली अर्पण केली.



## अनुष्का पाटोळे प्रकरणी खुनाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी

**राहुरी : हॅलो प्रभात**

लातूर येथील जवाहर नवोदय विद्यालयातील विद्यार्थिनी अनुष्का किरण पाटोळे हिच्या मृत्यू प्रकरणी आत्महत्येचा बनाव रचून खून दडपण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोप करत सत्यशोधक लहुजी क्रांती सेनेच्या वतीने संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर खुनाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे. दिनांक ४ जानेवारी २०२६ रोजी अनुष्का मृत अवस्थेत आढळून आली होती. प्रशासनाने आत्महत्येचा दावा केला असला तरी तिच्या शरीरावर मारहाणीच्या खुणा आढळून आल्याने खुनाचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. या प्रकरणी जिल्हा पोलीस अधीक्षक, लातूर यांना निवेदन देण्यात आले. यावेळी संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## राजमाता जिजाऊंची जयंती साजरी

**शिरूर : हॅलो प्रभात**



अखिल भारतीय मराठा महासंघ, शिरूर तालुका यांच्या वतीने राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ साहेब यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यनिमित्ताने विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम केलेल्या महिलांच्या सन्मान व नवनिर्वाचित नगराध्यक्षा व नगरसेवक यांना सन्मानित करण्यात आले. जयंतीनिमित्ताने शिवशंभू व्याख्याते राकेश पिंजण यांचे, जिजाऊ तुम्ही होतात म्हणून, या विषयावर व्याख्यान झाले. यावेळी नगराध्यक्षा ऐश्वर्या अभिजित पाचर्णे, पोलीस निरीक्षक संदेश केंजळे,मुख्याधिकारी प्रीतम पाटील भाजपचे तालुकाध्यक्ष राहुल बाबुराव पाचर्णे, आखिल भारतीय मराठा महासंघ शिरूरचे अध्यक्ष श्यामकांत वर्पे, लोकशाही क्रांती आघाडी चे अध्यक्ष रविंद्र धनक, शिरूर शहर विकास आघाडी चे अध्यक्ष सुभाष पवार, उमेश कणकवलीकर माजी उपसरपंच संजय शिंदे शिक्षण मंडळाचे माजी सभापती प्रदीप बारवकर आदी उपस्थित होते. पिंजन म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज व राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ मॉ साहेब यांनी जनतेच्या हिताचा सातत्याने विचार केला. जिजाऊ मॉ साहेब सर्वांच्या प्रेरणा स्थान आहेत. त्याच्या विचारांचे अनुकरण करावे असे आवाहन ही त्यांनी केले.

## राहुरी उपनगराध्यक्षपदी गजानन सातभाई

### स्वीकृत नगरसेवकपदी उदावंत, शेटे व शिंगी

**राहुरी : हॅलो प्रभात**



राहुरी नगरपालिकेच्या उपनगराध्यक्षपदी विकास आघाडीचे गजानन भागवत सातभाई यांची बिनविरोध निवड झाली. स्वीकृत नगरसेवक पदी विकास आघाडीचे डॉ.संतोष उदावंत,ॲड.राहुल शेटे तर विरोधी परिवर्तन आघाडी कडून नयन शिंगी यांची निवड करण्यात आली .उपनगराध्यक्ष पदासाठी मुख्याधिकारी अभिजित हराळे उपस्थितीत प्रक्रिया सुरू झाली १ वा.पर्यंत एकच अर्ज दाखल झाला. गजानन सातभाई यांचा अर्ज दाखल झाला सूचक म्हणून गटनेता हर्ष तनपुरे होते. दुपारी दीड वाजता उपनगराध्यक्ष म्हणून गजानन भागवत सातभाई यांची निवड जाहीर करण्यात आली.

नामनिर्देशित सदस्य पदासाठी अर्थात स्वीकृत नगरसेवक पदासाठी विकास आघाडी कडून डॉ.संतोष उदावंत व ॲड.राहुल शेटे यांची निवड जाहीर करण्यात आली, तर विरोधी परिवर्तन आघाडी कडून नयन शिंगी यांची निवड जाहीर करण्यात आली. यावेळी नगराध्यक्ष भाऊसाहेब मोरे यांनी सहाय्यक म्हणून भूमिका पार पाडली .

यावेळी सत्ताधारी गटाचे नगराध्यक्ष भाऊसाहेब मोरे ,आघाडीचे गटनेता हर्षअरुण तनपुरे ,जेष्ठ नगरसेविका डॉक्टर उषाताई तनपुरे ,विरोधी भाजपाचे गटनेता राजेंद्र उंडे ,नगरसेवक प्रतीक रावसाहेब तनपुरे यांच्यासह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भाविकांची पिळवणूक करणाऱ्या एजंटांवर प्रतिबंधात्मक कारवाई

### उपविभागीय दंडाधिकारी यांचे आदेश

**अहिल्यानगर : हॅलो प्रभात**
विनोद जवरे

शनिशिंगणापूर (ता. नेवासा) येथे देशभरातून येणाऱ्या भाविकांची एजंटांकडून (लटकू) होणारी आर्थिक पिळवणूक, फसवणूक व असुविधा रोखण्यासाठी प्रशासनाने कठोर पावले उचलली आहेत. या पार्श्वभूमीवर अहिल्यानगरचे उपविभागीय दंडाधिकारी सुधीर पाटील यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ च्या कलम १५२ (१) (a) अन्वये शिंगणापूर परिसरात प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत. शनिशिंगणापूर हे 'अ' वर्ग तीर्थक्षेत्र असून येथे दररोज हजारो भाविक दर्शनासाठी येतात. मात्र, शनिशिंगणापूर पोलीस ठाणे आणि नेवासा तहसीलदार यांनी सादर केलेल्या अहवालानुसार, मंदिर परिसर तसेच गावाच्या बाहेरील रस्त्यांवर काही खासगी व्यक्ती (एजंट/लटकू) भाविकांची वाहने अडवून त्यांना विशिष्ट दुकानांतूनच चढ्या दराने पूजा साहित्य खरेदी करण्यास भाग पाडतात. भाविकांनी यास विरोध केल्यास त्यांना दमदाटी व शिवीगाळ केली जाते. सन २०२५ मध्ये अशा प्रकारच्या ५३ गुन्ह्यांची नोंद झाली आहे. या प्रकारांमुळे भाविकांमध्ये असुरक्षिततेचे वातावरण निर्माण होत असून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असल्याने हे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

सदर आदेशाचे उल्लंघन झाल्यास संबंधित व्यक्तीविरुद्ध भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ च्या कलम २२३ अन्वये कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. तसेच, या आदेशाने प्रभावित झालेल्या कोणत्याही व्यक्तीला दि. २८ जाने .२६ पर्यंत उपविभागीय दंडाधिकारी, अहिल्यानगर यांच्या कार्यालयात उपस्थित राहून आपली बाजू किंवा हरकत नोंदवता येईल, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे. शनिशिंगणापूर पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्यांना या आदेशाची कठोर अंमलबजावणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

## ट्रकच्या धडकेत सख्ख्या बहिणींचा मृत्यू

**पिंपरी : हॅलो प्रभात**

ट्रकच्या धडकेत दुचाकीवर जाणाऱ्या दोन बहिणींचा मृत्यू झाला. ही घटना दुपारी काळेवाडी येथील धनगर बाबा मंदिरासमोरील पेट्रोल पंपाजवळ घडली.

ऋतुजा पांडुरंग शिंदे (वय २४) आणि नेहा पांडुरंग शिंदे (२०, रा. पुनावळे) असे मृत्यू झालेल्या बहिणींची नावे आहेत. ट्रक चालक जितेंद्र निराले (रा. खलघाट, जि. धार, मध्य प्रदेश) याला ताब्यात घेतले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नेहा आणि ऋतुजा दुचाकीने प्रवास करत होत्या. दरम्यान, काळेवाडी येथे भरधाव ट्रकने त्यांच्या दुचाकीला धडक दिली. धडकेनंतर दोघीही गंभीर जखमी झाल्या. त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. आयशर ट्रक चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून पुढील तपास पोलिसांकडून करण्यात येत आहे. या दुर्घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत असून शिंदे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

## कॅलिफोर्निया बदामांसह कापणीच्या उत्सवांना पौष्टिक स्पर्श

**मुंबई : हॅलो प्रभात**



मकर संक्रांती हा भारतभर कापणी, नवचैतन्य आणि दीर्घ दिवसांचे स्वागत करणारा सण आहे. पोन्गल, लोहरी, उत्तरायण आणि माघ बिहू अशा विविध रूपांत साजरा होणारा हा उत्सव पारंपरिक पदार्थांनी अधिक रंगतो. या सणात कॅलिफोर्निया बदामांचा समावेश करून चव आणि पोषण यांचा संतुलित मेळ साधता येतो. प्रथिने, आरोग्यदायी चरबी आणि अँटीऑक्सिडंट्सने समृद्ध असलेले बदाम दीर्घकाळ ऊर्जा देतात, रोगप्रतिकारशक्तीला आधार देतात आणि सणासुदीच्या अतिसेवनावर संतुलन राखण्यास मदत करतात. लाडू, चटण्या किंवा स्नॅक्समध्ये बदामांचा वापर केल्यास पारंपरिक जेवण अधिक पौष्टिक होते. नवी दिल्लीतील Max Healthcare येथील आहारतज्ज्ञ रितिका समद्दार यांच्या मते, "दररोज एक मूठ बदाम सणाचा आनंद घेताना पोषणाची तडजोड न करता आरोग्य राखण्यास मदत करतात." आयुर्वेद तज्ज्ञ डॉ. मधुमिता कृष्णन बदामांना 'बल्य' म्हणजे शक्ती वाढवणारे मानतात, तर पोषणतज्ज्ञ शीला कृष्णस्वामी यांच्या मते बदाम सणासुदीच्या पदार्थांना नैसर्गिक पोषण देतात.

बॉलीवूड अभिनेत्री Soha Ali Khan म्हणाल्या, "मकर संक्रांती हा कुटुंब आणि सकस अन्नाचा सण आहे. कॅलिफोर्निया बदामांमुळे चव आणि आरोग्य यांचा योग्य समतोल साधता येतो." या मकर संक्रांतीला पारंपरिक सणांचा आनंद घेताना कॅलिफोर्निया बदामांसह जेवणात पौष्टिकतेची भर घालून सण अधिक निरोगी आणि आनंदी करा.

## मारहाण करणाऱ्या कृषी अधिकाऱ्यावर कारवाई करा : नाना पटोले

**मुंबई : हॅलो प्रभात**



वाशिम जिल्ह्यातील गोगरी परिसरात मनरेगा योजने अंतर्गत संत्रा फळबाग अनुदान रखडल्याबाबत विचारणा केल्याने एका शेतकरी बांधवाला कृषी अधिकाऱ्याने बुटाने मारहाण केल्याची घटना अत्यंत संतापजनक आहे. या प्रकरणाची तातडीने सखोल चौकशी करून संबंधित मुजोर अधिकाऱ्यावर कठोर कारवाई करावी आणि पीडित शेतकऱ्याला तात्काळ न्याय द्यावा, अशी मागणी काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष आमदार नाना पटोले यांनी केली आहे. शेतकऱ्याला मारहाण केल्याच्या घटनेचा तीव्र निषेध करत नाना पटोले पुढे म्हणाले की, देवेंद्र फडणवीस यांचे सरकार शेतकरीविरोधी आहे, राज्याचे कृषिमंत्री शेतकऱ्यांना भिकारी म्हणतात, दुसरे आमदार शेतकरी आणि त्यांच्या कुटुंबाला अंगावरचे कपडे आणि पायातील चप्पल देतो असे म्हणून अपमान करतात. नेते तर मग्रुरी करताच पण आता अधिकारीही मस्तवालपणा करु लागले आहेत. मंगळूरपीर येथील तालुका कृषी अधिकारी सचिन कांबळे गोगरी शिवारात पाहणीसाठी गेला असता, पवार या शेतकरी बांधवाने त्यांच्या रखडलेल्या अनुदानाबाबत विचारणा केली असता या मस्तवाल कृषी अधिकाऱ्याने थेट शेतकऱ्याच्या अंगावर धावत जाऊन त्या शेतकऱ्याला बुटाने मारहाण केली तसेच शेतातील मातीची ढेकळे उचलून त्याच्यावर फेकली. इतक्यावरच न थांबता या मुजोर अधिकाऱ्याने शेतकऱ्याला "तुला गुन्ह्यात अडकवीन" अशी धमकी दिली. ही घटना संपूर्ण शेतकरी वर्गाच्या स्वाभिमानावर केलेला हल्ला आहे, असे नाना पटोले म्हणाले.

## शिर्डी : उपनगराध्यक्षपदी अभय शेळके

### धनराज कोते व अब्रार कैयुम शेख यांची स्विकृत नगरसेवक म्हणून निवड

**शिर्डी : हॅलो प्रभात**



नगरपालिका निवडणुकीत शहराच्या जनतेने अतिशय विश्वासाने भाजप आणि महायुतीवर दाखवलेला विश्वास विकास कामाच्या माध्यमातून सार्थ ठरविणार असून, कुंभमेळ्याच्या निमिताने विकास प्रक्रीयेत नगरपरीषद महत्वपूर्ण भूमिका बजावेल असा विश्वास जलसंपदा तथा पालक मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केला.

शिर्डी नगरपरीषदेच्या उपनगराध्यक्ष पदाची निवडणुक प्रक्रीया संपन्न झाली.सर्वानूमते अभय शेळके यांची उपनगराध्यक्ष पदावर निवड करण्यात आली. धनराज कैलास कोते अब्रार कैयुम शेख यांची स्विकृत नगरसेवक म्हणून निवड घोषित करण्यात आली.नविन पदाधिकर्यांचे मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी सत्कार करून अभिनंदन केले. नगराध्यक्षा सौ जयश्री थोरात सभापती ज्ञानेश्वर गोंदकर भाजपाचे जेष्ठ नेते राजेंद्र गोंदकर भाजपाचे शहर अध्यक्ष रविंद्र गोंदकर यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते. माध्यमांशी बोलताना मंत्री विखे पाटील म्हणाले की शिर्डीच्या जनतेने भाजप आणि महायुतीला ऐतिहासिक असे बहमुत देवून मोठे पाठबळ दिले आहे.

यापुर्वी शिर्डी शहरामध्ये निरंतरपणे सुरू असलेल्या विकास प्रक्रीयेला जनतेन नेहमीच साथ दिली आहे.यंदाच्या निवडणुकीत विकास कामांच्या मागे विश्वासाने उभी राहीली.येणार्या काळात शहराच्या विकासाच्या दृष्टीने सर्व नविन पदाधिकारी काम करतील.

नगरपरीषदेच्या निवडणुकीत मिळालेला ऐतिहासिक विजय जबाबदारीची जाणीव करून देणारा असल्याचे स्पष्ट करून विश्वनेते पंतप्रधान नरेंद्र मोदी केंद्रीय गृह मंत्री अमित शाह यांच्या मार्गदर्शनाखाली आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या निर्णयांचे असल्याचे आगामी कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर शहर विकासाला अधिक गती द्यावी लागणार आहे.

कुंभमेळ्यासाठी येणारे भाविक शिर्डी मध्ये मोठ्या संख्येने येतील त्यादृष्टीने आतापासून तयारी सुरू करावी लागेल.यासर्व विकास प्रक्रीयेत नगरपरीषदेची भूमिका महत्वपूर्ण ठरेल.शिर्डी शहर अध्यात्मिक कॉरीडॉर म्हणून विकसित करण्याचे नियोजन सुरू केले असून त्यावरच भविष्यात काम करायचे असल्याचे मंत्री विखे पाटील म्हणाले.